# कामगार पुतळा झोपडपट्टीमध्ये नगरसेविकेचे पुतण्यावर हल्ला करणारे ४ गुन्हेगारांना बेकायदेशीर पिस्तुल व कोयत्यासह गुन्हे शाखा युनिट १ कडील अधिकारी व स्टाफने घेतले ताब्यात

गुन्हे शाखा युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी असे बेकायदेशीर धंद्यावर कारवाई करणे कामी कामगार पुतळा झोपडपट्टी परिसरामध्ये पहाणी करीत असताना, पो ना तुषार खडके यांचे बातमीदारा कडुन खात्रीशीर बातमी मिळाली की, कामगार पुतळा झोपडपट्टी शेजारी नदी पात्रा मधिल महादेव मंदीरा समोर चार इसम बसले असुन, त्यांचे जवळ एक पिस्तुल व तीन कोयते आहेत, अशी खात्रीशीर माहिती प्राप्त झालेने, ती त्यांनी पो उप निरी श्री हर्षल कदम यांना सांगितली असता, लागलीच त्यांनी सदर बाबत वरीष्ठांना सदरची माहिती कळवुन, वरिष्ठांचे सुचना प्रमाणे सदर ठिकाणी छापा मारला असता, नमुद ठिकाणी इसम नामे -**१. राजु बापु ढावरे, वय २७, रा ८०६ कामगार पुतळा झोपडपट्टी, शिवाजीनगर, पुणे, २. सुरज ऊर्फ छोटया ज्ञानेश्वर पवार, वय २३ रा शंकर महाराज वसाहत, बौध्द विहार समोर, धनकवडी, पुणे, ३. सागर विलास देवकुळे, वय २३, रा ८०६ कामगार पुतळा झोपडपट्टी, शिवाजीनगर, पुणे, ४. दत्तात्रय ऊर्फ बंकी मोहन साठे, वय २७, रा शंकर महाराज वसाहत, बौध्द विहार समोर, धनकवडी, पुणे,** यांना ताब्यात घेवून, त्यांची अंगझडती घेतली असता, अ नं १ याचेकडे एक देशी बनावटीचे पिस्तुल, व अ नं २ ते ४ यांचे कब्जात तीन मोठे कोयते अशी घातक हत्यारे मिळून आली. नमुद हत्यारे ताब्यात घेवून, वरील चारही इसमांवर आर्म्स ॲक्ट ३(२५), ४(२५) व मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)१३५ प्रमाणे कारबाई करण्यात आलेली आहे.

वरील नमुद इसम हे पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, **अ नं १ याचेवर २, अ नं २ याचेवर ५, अ नं ३ याचेवर २ व अ नं ४ याचे वर १ असे शरिराविरूध्दचे गुन्हे दाखल** आहेत. सध्या ते **शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे दोन शरिरा विरूध्दचे गुन्हयामध्ये फरारी आरोपी आहेत.**

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे साो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे साो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री सुरेश भोसले साो., सहा.पोलीस आयुक्त, श्री समिर शेख साो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक हर्षल कदम, पो उप निरी दिनेश पाटील, सहा पो फौजदार राजाराम सुर्वे, तुषार खडके, इरफान मोमिन, श्रीकांत वाघवले, सचिन जाधव, इम्रान शेख, रिझवान जीनेडी, पो.शि. प्रशांत गायकवाड, मोहन येलपले, पो.शि. गजानन सोनुने, पो.हवा. प्रकाश लोखंडे, अशोक माने, उमेश काटे, राजू पवार यांनी केली आहे.